REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 10 | JULY - 2017

# वा.रा.कांत यांची नभोनाट्य

डॉ. यशपाल भिंगे
पीपल्स कॉलेज, नांदेड.



## प्रस्तावना :

प्रस्तुत निबंधात वा.रा. कांत यांची सहा नभोनाट्य (म्हणजेच श्रुतिका) अभ्यासाला घेतली आहेत. यात 'बासरी', 'दुल्लही पिआ' व 'बनारसची सकाळ' हे मूलतः नभोनाट्य असून त्यांचे मुंबई आकाशवाणीवरून प्रक्षेपण झालेले आहे. तर 'हवन','पाषाणावरील तीळ' व 'गांधारी' हे मूळात नाट्याकाव्ये असून त्यांचेही प्रक्षेपण आकाशवाणीवरून झालेले असल्याने त्यांचीही निवड इथे करण्यात आली आहे.

वा.रा.कांत यांनी आपल्या काव्यलेखनात सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत आपला 'अजूनपणा' टिकवून ठेवलेला होता. १६३२ मधील जातिछंदात चाचपडणारी त्यांची कविता १६४० मध्ये मुक्तछंदातील लयबद्ध पदन्यास लिलया करू लागली. त्यात विविध रचना भाषेचे प्रयोग होते. अभंग, संवाद, प्रश्नोत्तरे सारख्या प्रयोगासोबतच जुन्या वळणाची संस्कृतनिष्ठ रचना, पदावली पासून खंडकाव्य, नाट्याकाव्य, श्रुतिकासारखे दीर्घ रचना प्रकार होते. प्रयोगशीलता हा त्यांच्या काव्याचा स्थायीभाव होता. एकाच वेळी विविध रचनाबंध हाताळणे सोपे नसते. केवळ कवीचा तोंडवळा स्पष्ट करण्यापुरता हा मुद्दा नाही तर एकूणच काव्यप्रकृतीच्या मर्यादा स्प्ष्टावत नेणाराही हा मुद्दा आहे. परंतु कांतांनी ही जोखीम पत्करण्यात धन्यता मानली आहे. समीक्षकांनी दाखवून दिलेल्या मर्यादांचे उल्लंघन करण्याच्या हट्टापायी कांत पुनरूपुन्हा प्रयोग करीत राहिले. त्यातूनही त्यांचा 'अजूनपणा' टिकून राहिला.

ज्या काळात मराठीत कथात्मक काव्यलेखन ओसरत होते त्याकाळात वा.रा.कांत निष्ठेने खंडकाव्य, नाट्याकाव्य, नभोनाट्या लिहित होते. या संदर्भातील त्यांची भूमिका त्यांनी १७ डिसेंबर १६८७ च्या 'दै. मराठवाडा' मधून मांडली आहे. ते म्हणतात, "अशा काव्यातून माणूस, त्याचं मन,त्याचं सृष्टदृष्ट चरित्र, त्याची मानवता आणि अमानवीपणा, त्याचं अधःपतन आणि उन्नयन या सर्वांतले नाट्या संवादाच्या माध्यमातून शब्दांमध्ये पकडण्याचा प्रयत्न मी केला आहे आणि अशा जातीच्या काव्यदर्शनासाठी नाट्याकाव्य हे फार परिणामकारक व प्रभावी माध्यम आहे, असं माझ्या लक्षात आलं. दुसरी एक गोष्ट माझ्या ध्यानात आली ती अशी, नाट्याकाव्यात माणूस त्याच्या सर्व तपशिलासह व रूपा – मनासह पकडता येतो. मानवी जीवनातलं विज्ञान नाट्याच थोड्याशा ओळीत दर्शन घडविता येतं. हा अनुभव महत्त्वाचा आहे, यात निवेदनं येत नाहीत. प्रत्यक्ष माणूस त्यांच्या शब्दांतून उभा राहतो. हे नाट्या मला फार ओढ लावतं. शिवाय यात स्थळ, काल किंवा निसर्गाच्या फाफट पसाऱ्याला स्थान नसते.

मी आजचा काळ व समाज यांच्याकडे दुर्लक्ष करून पौराणिक कथांत मानवतेचे मानदंड शोधतो म्हणून हा कवी भूतकाळाचा पुजारी आहे, 'प्रेमपूजक' आहे, असे आरोप वाचकांकडून माझ्यावर होतील होतातही. पण त्याला माझं उत्तर अस की, जी मानवता माझ्या प्रतिभा दृष्टीला दिसते त्याला शोभणारे त्याला साथ करणारे भव्य दिव्य मानदंड मला आजच्या जगात आढळत नाहीत. काही अत्याचार वगळता

आजची माणस फार सुखी आहेत, असं मला वाटतं. त्यासाठी मी पौराणिक स्त्री–पुरुषांच्या चरित्ररेखाकडे वळतो, परंतु अस करता एक काळजी घेतो. या पौराणिक घटनांकडे व पात्रांकडे श्रद्धेने मी पाहिलं नाही. उलट त्या श्रद्धेचा त्याग करूनच ही माणसं त्यांच्या 'नग्न' स्वरुपात मी दाखवली आहेत.." कातांच्या या भूमिकेतील पुराणभिमुखतेचे स्पष्टीकरण अनेकांना न पटण्यासारखे आहे. 'अर्वाचीन मराठी काव्यदर्शन' या बृहदग्रंथात डह्.अक्षयकुमार काळे यांनी कातांच्या वरील भूमिकेसंदर्भातील मतभेद तीव्र स्वरुपात मांडताना कांतांजवळ आजची सुख दुःखे, अनुभूतिविषय होण्यासाठी आवश्यक असणारी अभिमुखता नाही अशी टीका केली आहे. तसेच, पौराणिक, धार्मिक वाङ्मयाच्या पूर्वसंस्काराने त्या विश्वात रममाण होण्यातच कवीला कृतार्थता वाटत असावी आणि तयार कथासूत्रामुळे संपूर्ण नवनिर्मितीच्या दडपणापासून त्याची अपोआप सुटका होत असावी असे दोन आक्षेपार्ह मुद्दे उपस्थित केले आहेत. डह्.काळे यांनी मांडलेले मुद्दे साधारणतः बरोबर आहेत पण अंतिमतः चुकीचे आहेत खरेतर नावनिर्मितीपासून पळून जाण्याचा प्रश्न कांतांसारख्या नवोन्मेषक प्रयोग करणाऱ्या कविसंबंधी उपस्थित होत नाही. कांतांची कथाकाव्ये वर्तमानाला अभिमुख राहतात. म्हणूनच जिवंत संवाद करण्याचा विशेष त्यात आहे. पुराणव्यक्तीतील 'माणूस' शोधण्याचा कांतांचा छंद काय सांगतो ? राहता राहिला मुद्दा कांतांच्या भूसंवेदनाचा त्याचा शोध त्यांच्या चरित्रातून घेतला पाहिजे. 'रुद्रवीणा' च्या प्रस्तावनेत प्रभाकर पाध्ये यांनी 'कांत मराठवाड्याचे' असे वारंवार म्हंटले आहे. अनेकांना ते न आवडणारे असले तरी कातांच्या भूतकाळावरील प्रेमाचे कारण या प्रदेशातून तयार झाले आहे. पारतंत्र्यातील अमानुष मुस्कटदाबी सहन करणारे मुके मन भूतकाळात अधिक रमणारे असते. विमुक्त जगण्याचे संदर्भ शोधताना भूतकालीन जगण्याचे आधार आश्वासक वाटत असतात. म्हणूनच कातांच्या स्फुट किंवा कथात्मक कवितेत पौराणिक, ऐतिहासिक संदर्भ वारंवार येतात. त्यांच्या मानवतावादी संवेदनशील मनाचा तो अपरिहार्य भाग आहे. इतिहासदत्त कर्तव्याशी बांधील असलेली त्यांची वृत्ती आहे. यातून त्यांच्या काव्यातील कल्पनानिष्ठ प्राधान्यालाही पुरेसा अवकाश मिळतो. 'अग्निपथ' सारख्या सुरुवातीच्या खंडकाव्यातून त्यांनी फारशी परिचित नसलेली भागवतातील वेन राजाची कथा मांडली आहे. किंवा 'पहाटवारा', 'वेलांटी' तील ऐतिहासिक व्यक्तीसंबधीच्या (उदा.टिळक,गांधी) कविता आपल्याला उदाहरण म्हणून सांगता येऊ शकतात. 'मरणगंध' च्या 'गंधवार्ते' तूनही हे समजून घेता येईल.

मला आणखी एका आक्षेपाचा उल्लेख करणे गरजेचे वाटते. डह्. बाळकृष्ण कवठेकरांनी 'प्रतिष्ठान' च्या १९६४ मधील सप्टेबर ते डिसेंबर या काळात निघालेल्या दोन अंकांतून कांतांच्या काव्यलेखनासंदर्भात काही मुद्दे उपस्थित केले आहेत. वेगवेगळया कालखंडात कांतांनी आपल्या कवितेचे वेगवेगळे आदर्श स्वीकारले (उदा.केशवसुत,तांबे,मर्ढेकर,करंदीकर) त्यामुळे कांतांना स्वतः चे 'कांतपण' ठळक करता आले नाही. तसेच कांतांच्या जवळ चिंतनशीलता आढळत नाही म्हणूनच त्यांच्या कवितांतील 'विचार' सांकेतिक स्वरुपात गद्यप्राय विधानांच्याद्वारे व्यक्त होताना दिसतात. माझ्या मते, या आक्षेपांच्या मुद्यांचे उत्तर कांतांनी आपल्या नाट्याकाव्य व नभोनाट्यामधून दिले आहे. कांताना या दोन्ही काव्य प्रकारात कुणाला आदर्श मानण्याची सोयच नव्हती कारण नाट्याकाव्यात वा.ना. देशपांडे आणि कांत अशा दोघांचीच प्रामुख्याने नवे घेतली जातात. आणि दोघांच्याही लेखन वृत्तीत मूलतरूच फरक आहे. डह्. कवठेकरांनी म्हटल्याप्रमाणे कांतांचे कवितेतील विचार सांकेतिक स्वरूपाच्या गद्यप्राय विधानांच्याद्वारा व्यक्त होतात. ही मर्यादा नाट्याकाव्य किंवा नभोनाट्या लेखनासाठी अनुकूल ठरणारी अशीच आहे. कांतांच्या नादमय चिंतनशीलतेचा अनुभव त्यांची नभोनाट्या वाचताना येतो.

या जरा अधिकच विस्तारलेल्या पार्श्वभूमीवर कांतांच्या नभोनाट्याचा विचार करणे अधिक श्रेयस्कर होईल, असे मला वाटते. आपल्यालाडे नाट्या काव्याच्या मंचीय सादरीकरणाची परंपरा नाही. वा.रा.कांत हे आकाशवाणीत अनेक वर्षे नोकरीत राहिले. त्यांनी आपल्या काही नाट्याकाव्याला नभोनाट्याचे रूप देऊन प्रक्षेपित केले. काव्यदृष्टिप्रधान पद्यमय नाटक म्हणजे नाट्याकाव्य. लवचिक छंद असलेला, संवादाला महत्त्व देणारा हा प्रकार. नभोनाट्याशी अनेक पातळयांवर साधर्म्य साधणारा प्रकार असला तरी भावतरलतेला, व्यंजकतेला, प्रतिमात्मकतेला यात अधिक महत्त्व असते. पात्रसंख्या अधिकची राखता येते. संवादानुरूप अंकांची विभागणी असते. नाट्याकाव्य हे प्रयोगदृष्टिप्रधान नसले तरी नाट्यातील संवाद, संघर्ष, गतिमानता, घटना, प्रसंग इत्यादींचे अस्तित्व त्यात असतेच. याउलट नभोनाट्यात पात्रसंख्या मोजकीच राखावी लागते. केवळ ध्वनी हाच नभोनाट्याचा प्राण असतो. यातील

आशय श्रोत्याला आपल्या कल्पनाशक्तीच्या साहाय्यानेच आपल्या मनोमंचावर उभा करावा लागतो. निवेदकाचा आवाज ही एकच पात्रनिर्देशक गोष्ट असते. त्याला अनेक पदरी कथानक चालत नाही. साधारणतः सर्व प्रवेशांना जोडणारे सूत्र असावे लागते. त्याच्या यशस्वी आविष्कारासाठी संगिताचा आधार महत्त्वाचा ठरतो. निवेदनाचे तपशील संगितातून प्रकट करावे लागतात. यादृष्टीने कांतांची काही नाट्याकाव्ये यशस्वी होण्यासारखी वाटतात तर काहींच्या बाबतीत शंका वाटू लागते.

'हवन' हे मुळचे नाट्याकाव्य. पहिला भारतीय कथाकार गुणाढ्याच्या जीवनावरील हे काव्य आहे. ०७ मे १९७८ रोजी याचे मुंबई आकाशवाणीवरून ध्वनीप्रक्षेपण झाले. पारतंत्र्य, दास्य याविषयीची कांतांच्या मनातील चीड इथे आविष्कृत होते. गुणाढ्या, प्रभादेवी सातवाहन, शिवशर्मा अशी मोजकीच पात्रे घेऊन वेगवान संवादकाद्वारे हे नाटक फुलत जाते. जन्मदलित असलेल्या गुणाढ्याच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक संघर्षाची ही कहाणी आहे. 'बृहत्कथा' ग्रंथ पाकृत भाषेतून लिहिला म्हणून ती राजद्रोहाचा गुन्हा ठरतो. प्रतिभादेवी राणीची गुणाढ्याला साथ असते. राजा सातवाहनाच्या मनात तिच्या चारित्र्याबाबतचा संशय निर्माण करून देण्यात मंत्री शिवशर्मा यशस्वी होतो. महाराणीचे गुणाढ्यावरील प्रेम अनेक छटा व्यक्त करणारे आहे. शेवटी, लोकधारामुळे ग्रंथ न जळता टिकून राहतो. असे कथानक आहे. कांतांच्या एकूणच नभोनाट्यात मानवी मनाचे पापुद्रे फार हळुवारपणे उलघडताना पहावायास मिळतात. कलावंतांचे प्रतीभिक विश्व, त्यांची बंडखोरी, मनाचा नितळ निष्पापपणा, कलेसाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची त्यांची वृत्ती व अशा गुणसमुच्चयामुळे महाराण्यांचे बेपर्वा प्रेमात पडणे आणि मग त्यातून संघर्ष पेट घेणे जवळजवळ सर्वच नभोनाट्यात पहावयास मिळते. यामधून स्त्रीमनाचा कोंडमारा, संस्कृतीचे आतून बंद बेट, पुरुषसत्ताक वर्चस्वाचा धाक असे विषय प्रेमकहाणीला केवळ भूतकालबद्ध ठेवत नाहीत तर सर्वकालिकतेच्या कक्षेत आणून सोडतात. 'हवन' सारख्या श्रुतिकेतून कांतांनी केलेले समाजविषयक चिंतन अत्यंत भावमधूर स्वरूपाचे आहे.

'पाषाणावरील तीळ' या मुळच्या नाट्याकाव्यातून कांतांनी जीवन आणि कला यांच्या अनेक गुंतागुंतीच्या समस्या काव्यमय पातळीवरून मांडल्या आहेत. शैलेंद्र या शिल्पकाराच्या राजा तिरूमल्लराय आपली राणी तिलोत्तमाचे पाषाण शिल्प घडवू इच्छितो. राणीच्या मांडीवरील तिळाची कल्पना अमात्य शैलेंद्रला देतो. शिल्पावरील त्या तिळाच्या जागी शिल्प भंगत जाते. यावरून संशयाचे राजकारण पेटते. अमात्य आपले डोळे जाळून घेतो. राणीचे चारित्र्यहनन केले जाते. शैलेंद्र बंदिगृहात टाकला जातो. असे शोकात्मक परिणाम असलेले कथानक या श्रुतिकेचे आहे.कल्पना आणि वास्तव व वासना आणि कलात्मक सत्यार्थ यातील द्वंद्व अत्यंत तरल शब्दात या संहितेतून प्रकट झाले आहे. कांतांच्या कल्पनाशक्ती व चिंतनशक्तीची झेप थक्क करणारी अशीच आहे. संस्कृत नाटकातल्याप्रमाणे, कांत काही पौराणिक संहितेतून विदुषक अत्यंत खुबीने उभा कारतात. 'दुल्लही पिआ' मध्येही हा विदुषक प्रभावीपणे पुढे येतो. 'पाषाणावरील तीळ' मध्येही शैलेंद्र व तिलोत्तमा यांच्या अंतस्थ प्रेमाचे भावनाट्या आहे.

'गांधारी' हे 'मरणगंध' मध्ये समाविष्ट असलेले नाट्याकाव्य आहे. याचे नभोनाट्या सुलभा देशपांडे सारख्या बिनीच्या कलाकाराच्या निवेदनातून सादर झाले आहे. इथेही गांधारीच्या निमित्ताने स्त्रीमनाचा अनेक पातळयांवरून वेध घेण्याचा प्रयत्न कांतांनी केला आहे. संहितेत निसर्ग प्रतिमांचा सूचक वापर अर्थपूर्ण आहे. पती आणि पत्नीचा संसारधर्म प्रेम, त्याग, सत्य या आधारे सफल होतो हे दाखवताना गांधारी तत्त्व आणि व्यवहार यातील सीमारेषा कशी भेदक असते हे दाखवून देते. कांतांच्या सर्वच संहितेतील प्रेमकहाण्या विफल अवस्थेतील आहेत. त्या लोकरूढींना धक्का देणाऱ्या नव्या पर्यायांची मांडामांड धाडसाने करू पाहणाऱ्या अशा कहाण्या आहे. त्यांना नैतिकतेच्या कसोट्या लावताच येऊ नयेत अशा त्या विमुक्त आहेत.

'दुल्लही पिआ' ही श्रुतिका राजा अग्निमित्र व नृत्यांगना मालविका यांची प्रेमकहाणी मांडणारी आहे. यात कलावंत, कलेचे जग याविषयी कांतांनी अपार श्रद्धेने लिहिले आहे. यातील अनेक योगायोग उथळ स्वरूपाचे जाणवतात. संहितेतील प्रेमभावनेचे प्रसंग अनावश्यक, अस्थानी काव्यात्मक झाल्यासारखे वाटतात. पात्रांच्या गर्दीचे कथानक अधिक दीर्घ ओढण्याच्या प्रयत्नातून ही श्रुतिका ध्वनिआविष्कारात सदोष ठरली असावी असे वाटते.

'बासरी' या नभोनाट्यातून पुन्हा बासरी व सरजू यांची कलेच्या पातळीवरील स्वप्नमय प्रेम कहाणी कांतांनी मांडली आहे.कांतांच्या उर्दू भाषेचे ज्ञान संहितेतून प्रभावीपणे व्यक्त होते. बासरी आणि बंदूक यातील विरोधात्मकता काव्यात्मक पातळीवर तरलपणे प्रकट होते. 'हिंसकवृत्तीला कलेचे संवेदन श्रांत करू शकेल' या विचारावर हिंसा मात करते. त्याची वेदना संहितेत प्रकट होते. या कहानीतही संशयकल्लोळ आहे. पुरुषसत्ताक मानसिकतेचे जंतू एखाद्या घटनेतून उफाळून येणे, त्यातून हिंसा घडणे व शेवटी नवऱ्याला उपरती होणे हे कांतांचे आवडते सूत्र या संहितेत देखील पहावयास मिळते. या नाटिकेत सलिम, अनारकलीचे नाटकातील नाटक आले आहे. विफल प्रेमकहानीतील वेदना कांतांच्या आस्थेचा विषय आहे, हे जाणवत राहते.

'बनारसची सकाळ' या एकमेव नभोनाट्यातच पौराणिक विषय आलेला नाही. परंतु इतर संहितेतील सर्व विशेष यात एकवटलेले आहेतच. नभोनाट्यातून समकालीन विषयाची मांडणी करताना कांत खूपच कमी पडताना दिसतात. 'बनारसची सकाळ' मध्येही योगायोगाची संभवनीयता न पटणारीच आहे. अनाथ आप्पांचा सांभाळ काका करतात. त्यांच्या दत्तक मुलीसोबत म्हणजे कोड (कुष्ट) असल्याच्या संशयावरून अप्पा तिला टाकतो. दुसरे लग्न करतो. माळण्याला राहतो. पुढे त्यालाच कुष्टरोग होतो. अशावेळी पुन्हा नर्मदा विसरून धावत येते. पुढे दुसरी बायको आजारपणात मरते. नर्मदाही मारते. अप्पा एकटा पडतो. त्याचे हाल होतात. मुलगा, सून यांना अप्पा नकोसा होतो व शेवटी बनारसला भिकाऱ्याचे जीवन जगत तो मरण पसंद करतो. अशी अप्पाचे पश्चातापदग्ध भयंकर वेदना केंद्र करण्याचा अट्टाहास कांतांनी धरला आणि उथळ योगायोगाने संहिता दुबळी होतानाचा अनुभव आपल्याला घ्यावा लागतो. सकाळ आणि संध्याकाळच्या पार्श्वभूमीवरील कांतांनी रेखाटलेले जीवनकाव्य मात्र अप्रतिम आहे. सूचक रंगप्रतिमांचा सुरेख वापर केल्याने संहितेत काही प्रमाणात जान आली आहे.

कांतांच्या या सहा नभोनाट्यालेखनातून त्यांचे काही प्रातिनिधिक विशेष पहावयास मिळतात.

१. कांतांना पौराणिक विषयाचे जात्याच आकर्षण आहे.
२. भारतीय जीवनपद्धतीचा प्रवृत्तीवाचक शोध घेण्याचा ते प्रयत्न करतात.
३. नाट्यालेखनाचे काव्यात्म कौशल्य पहावयास मिळते.
४. जीवनाच्या कालातीत स्थिर दर्शनांचा शोध घेण्याची प्रबळ इच्छाशक्ती कांतांच्या जवळ आहे.
५. स्त्री,कलावंत, विद्वान यांच्या चित्रणातून मानवमुक्तीचे व्यापक चिंतन करणे. सर्वप्रकारच्या सत्तावादाला विरोध करणारी अत्यंत पुरोगामी भूमिका घेण्याची कांतांची बंडखोर वृत्ती प्रकट होताना दिसते.

तसेच कांतांच्या नभोनाट्यालेखनाच्या काही मर्यादादेखील सांगता येतील.

१. उत्कट काव्यउर्मीमुळे काही कल्पना अतिरेकी स्वरुपात ताणल्या जातात. त्यामुळे कलाहीन पसरटपणा निर्माण होतो.
२. संस्कृत काव्याच्या प्रभावातून दुर्बोधता जन्माला येते. संवाद नादमय करण्याच्या नादात पुष्कळवेळा अर्थहानी होताना दिसते.
३. 'प्रेम + संशयकल्लोळ + पश्चाताप + विफलता' अशा सूत्राचा वारंवार वापरामुळे काव्यवृत्तीला एकारलेपण प्राप्त होते.
४. निसर्ग प्रतिमांची अनावश्यक गर्दी निर्माण करण्यातून आशयतत्त्व हरवण्याची भीती निर्माण होते.

कदाचित ह्या श्रुतिका वाचून केलेली माझी मांडणी त्यांच्या श्रवणातून पुन्हा वेगळे रूप घेऊ शकेल का ? असा पेशन स्वतःला विचारत मी आपली रजा घेतो. धन्यवाद.

## संदर्भ –

१. 'पंचधारा' ( कांत विशेषांक, एप्रिल – सप्टे १९६४)
२. मराठी वाङ्मयकोश – खंड ४ था.
३. अर्वाचीन मराठी काव्यदर्शन – डह्. अक्षयकुमार काळे.
४. प्रतिष्ठान – अह्गस्ट – अह्क्टो व नोव्हे – डिसें. १९६४
५. वाङ्मयीन संज्ञा – संकल्पना कोश
६. वा.रा.कांत यांची सहा नभोनाट्यो